# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक - 08.12.2024** **वार – रविवार**

---

**पुस्तक महोत्सव**

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या वतीने 14 ते 22 डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या पुणे पुस्तक महोत्सवाची जय्यत तयारी सुरू आहे. या महोत्सवाला पुणे, नगर, नाशिकसहसह राज्यातील विविध ठिकाणचे वाचन प्रेमी भेट देणार आहेत. महोत्सवात अधिकाधिक युवकांचा सहभाग असावा यासाठी संयोजक राजेश पांडे प्रयत्नशील आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांनी यात सहभागी होत वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी पुढे यावं असं आवाहन राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केलं आहे.

**प्रकृती अभियान**

पुणे जिल्ह्यामध्ये 'देशाची प्रकृती' अभियानाला सुरुवात झाली आहे. या अभियानाद्वारे आयुष रुग्णालयात नागरिकांची मोफत तपासणी करून त्याचं  प्रमाणपत्र त्यांना दिलं जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी दिली. हे अभियान २५ डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे. यासाठी केंद्रीय आयुष मंत्रालयानं मोबाईल ॲप तयार केलं आहे. अठरा वर्षांपुढील सर्व व्यक्तींनी आयुष रुग्णालयात जाऊन प्रकृतीची तपासणी करून घ्यावी, त्यानंतर आयुर्वेदाप्रमाणे आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करण्यासाठी मार्गदर्शनही केलं जाईल, असं पाटील यांनी म्हटलं आहे.

**संत संताजी जगनाडे**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे विचार जिवंत ठेवत, आपल्या लेखनातून समाज प्रबोधनाचं काम करणारे संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज साजरी करण्यात आली. कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू प्राध्यापक डॉक्टर पराग काळकर यांनी संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**'गांधीदर्शन'**

युद्ध आणि बंदुकांच्या काळात गांधीजींनी सत्याग्रह हे शस्त्र यशस्वी करून दाखवलं; असं प्रतिपादन गांधी पीस फाऊंडेशनचे अध्यक्ष कुमार प्रशांत यांनी आज पुण्यात केलं. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या

वतीने आयोजित 'गांधी दर्शन' शिबीरात ते बोलत होते. सगळेच देश स्वतंत्र झाले. पण, मानवी मूल्यांचा आग्रह फक्त भारतीय स्वातंत्र्यलढयात धरला गेला. त्याचं श्रेय गांधीजींना जातं, असं  कुमार प्रशांत म्हणाले. यावेळी साप्ताहिक 'साधना'चे संपादक विनोद शिरसाठ यांनी युवकांसमोरील आव्हाने, या विषयवार मार्गदर्शन केलं.

**एकवीरा उत्सव**

कार्ल्यातल्या एकवीरा गडावर आज, “एक दिवस कायस्थांचा” हा एकविरा देवीचा उत्सव आणि पालखी सोहळा उत्साहात पार पडला. पुणे सीकेपी फॅमिली पब्लिक ट्रस्ट, कायस्थ प्रभू उत्कर्ष संस्था आणि धर्मवीर आनंद दिघे विचार मंच यांनी संयुक्तरीत्या ह्या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. सकाळी देवीचा होम आणि अभिषेकाने सुरु झालेल्या या कार्यक्रमात नंतर देवीची पालखी, आरती, महाप्रसाद, भजन, भारुड आणि गोंधळ आदी कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडले. मोठ्या संख्येनं भाविकांना या उत्सवात सामील होता यावं यासाठी बहुसंख्य कार्यक्रम गडाखाली घेण्याचं आणि केवळ देवीची पालखी मोजक्या भक्तांच्या उपस्थितीत गडावरील मंदिरापर्यंत नेण्याचं नियोजन या उत्सवात केलं जातं.

**मृत प्राणी दहन**

पुणे महापालिकेचा नायडू रुग्णालयातील पाळीव आणि भटक्या प्राण्यांच्या मृतदेहांच्या दहनासाठीचा प्रकल्प बंद असल्यामुळे कात्रजच्या राजीव गांधी प्राणिसंग्रहालयातील दहन केंद्रावर प्राण्यांचं दहन केलं जात होतं. मात्र, या केंद्रातील धूर आणि वासाचा नागरिकांना त्रास होऊ लागल्याने तिथे केलं जाणारं दहनही थांबवण्यात आलं असून आता पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दहन केंद्रावर पुणे  महापालिकेच्या हद्दीतील मृत प्राण्यांचं दहन करण्यात येणार आहे.

**कात्रज कोंढवा**

पुणे शहरातील कात्रज-कोंढवा रस्ता तयार करण्यासाठी सात जागा मालकांनी तयारी दाखविली आहे. त्या बाबतचे प्रस्ताव पुणे  महापालिकेकडे दिले आहेत. रस्त्याच्या भूसंपादनाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासाठी एक खिडकी योजना सुरू केली जाणार आहे. कात्रज इथल्या राजस सोसायटीपासून कोंढवा इथल्या खडी मशीन चौकादरम्यानच्या रस्त्याचं  रुंदीकरण करण्यात येणार आहे. या कामाला 31 ऑक्टोबर 2018 रोजी मान्यता मिळाली असून, भूसंपादन न झाल्याने रस्त्याचं काम रखडलं आहे.

**“तीर्थ शिवराय”**

पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी विद्यालयातील 1200 विद्यार्थी “तीर्थ शिवराय” हा कार्यक्रम सादर करणार आहेत. 13 डिसेंबर रोजी टिळक रस्त्यावरच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर हा कार्यक्रम होणार आहे. संगीत, नृत्य आणि नाटक या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील प्रसंग या कार्यक्रमातून उलगडून दाखवले जाणार आहेत. विद्यार्थ्यांच्या लाठी- काठीचे प्रात्यक्षिक हे या कार्यक्रमातील प्रमुख वैशिष्ट्य असेल.

**बाजार समिती**
पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्याने गाजर, काकडी, वांगी आणि फ्लॉवरच्या भावात घसरण झाली तर शेवगा आणि लसणाच्या तेजीला लगाम बसला आहे. बहुतेक पालेभाज्यांचे भाव स्थिर आहेत. फळ बाजारात मोसंबी कलिंगड पपई खरबूज आणि डाळिंबाच्या भावात वाढ झाली. लग्नसराईमुळे फुलांना मोठी मागणी असली तरी आवकही चांगली असल्याने जवळपास सर्वच फुलांच्या भावात घसरण झाली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**